# <u>*वार्तापत्र*</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- ०५/०३/२०१८

## *नक्षलवादयांकडून जिवे ठार मारण्याची शंकर आचला यांना धमकी*

धानोरा तालुक्यातील कटेझरी पोलीस मदत केंद्रांतर्गत येत असलेल्या भटमारयान येथील गाव पाटील शंकर आचला आणि त्यांची मुले, सुना व नातवंडे असे संपुर्ण कुटुंबातील अकरा जण दिनांक २३/०२/२०१८ रोजी स्वत: पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली येथे येऊन मा. पोलीस अधिक्षक यांच्या समोर आपली ओळख सांगून आपल्याकडे २८ एकर शेती असून गावात इतरांपेक्षा आर्थिक सुबत्ता चांगली असल्याने आणि स्वत:हून वेगवेगळया सामाजिक कार्यक्रमात भाग घेत असल्याने नक्षलवादी हे नेहमीच आपल्याला त्रास देत असल्याचे सांगितले.

तसेच मागील ७ ते ८ दिवसांपासून नक्षलवादी हे मला व माझ्या मुलांना तुमच्याकडे एवढया गाडया कश्या आणि तुमच्याकडे पैसे येतात कसे म्हणून जिवे ठार मारण्याची धमकी देत असल्याचे आणि नक्षलवादी यांना घाबरून आपण परत आपल्या गावी जाणार नाही असे सांगितले.

मा. पोलीस अधिक्षक सो. यांनी सदर प्रकाराबद्दल शहानिशा करून शंकर आचला आणि त्यांच्या कुटुंबातील लोकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने शंकर आचला यांच्या इच्छित ठिकाणी त्यांना संरक्षण दिले आहे.